राज्य आरोग्य माहिती व
जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय,
पुणे-४११ ००१

सत्यमेव जयते

बेटी बचाओ
save the girl child

उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य
नायडू हॉस्पिटल कंपाऊंड,पुणे-१

दूरध्वनी: ०२०-२६०५८७४७(वै.)
०२०-२६०५९५३०(का.)
फॅक्स : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल: crs_d83@yahoo.com

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/सेरोगेट मदर-जन्म नोंद/7843-57/२०११,दिनांक 16 सप्टेंबर २०११

प्रति,
कार्यकारी आरोग्य अधिकारी,
तथा निबंधक, जन्म व मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एफ दक्षिण विभाग, ३रा मजला
डॉ. बी.आर.आंबेडकर मार्ग,परेल, मुंबई -१२

विषय :- सेरोगेट मदर प्रकरणी जन्म नोंदणी करण्याबाबत....

संदर्भ :- आपले पत्र क्र. एचओ/२४९६०/नों.१/दि. १३.९.२०११

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, आपण सेरोगेट मदर प्रकरणातील बालकांच्या जन्म नोंदणी संदर्भात, या कार्यालयास संदर्भित पत्राद्वारे मार्गदर्शन मागितले आहे. IVF तंत्रज्ञान व सरोगसी या बाबत ICMR (Indian Council of Medical Research) यांनी कायदयाचा मसुदा तयार करुन केंद्र शासनास सन २०१० ला सादर केला आहे. सदर कायदा अद्यांप पारित झालेला नाही. तसेच सेरोगेट मदर प्रकरणी महानिबंधक जन्म - मृत्यु, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचना अद्याप प्राप्त नाहीत. नमूद प्रकरणात केवळ भारत सरकारचे मार्गदर्शन नाही म्हणून जन्म नोंद थांबविता येणार नाही. त्यामुळे आपण विचारलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने आपणास खालील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे -

१) केंद्रीय जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील तरतुदीप्रमाणे घटना घडतेसमयी उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, प्रत्येक घटनेची नोंद होणे बंधनकारक आहे.

२) 'सेरोगसी' प्रकरणात जन्म नोंद अहवाल फॉर्म नं. १ हॉस्पिटलमार्फतच उपलब्ध होणे आवश्यक आहे.

३) 'सेरोगसी' संबंधातील वैद्यकिय कागदपत्रे, IVF तंत्रज्ञानाचा वापर करणारी संस्था यांची जबाबदारी राहणार असून कोणताही वाद अथवा न्यायालयीन वाद उपस्थित झाल्यास, याचा पूर्णपणे निपटारा करण्याची जबाबदारी कायदेशिर पालक (Commissioning Parents) व IVF तंत्रज्ञानाचा वापर करणारी संस्था यांची राहणार आहे. हॉस्पिटलकडून जन्म घटनेची नोंद घेण्याची जबाबदारी निबंधकांची आहे. व त्यास अनुसरुन प्रमाणपत्र अदा करण्याची जबाबदारी निबंधकांची आहे.

४) हॉस्पिटल मार्फत नोंद निबंधकाकडे पाठविताना वडिलांचे नाव व आईचे नाव या रकान्यात फक्त अनुवंशिक माता व पिता (Genetic Mother & Father) यांचीच नावे येणे बंधनकारक आहे.

५) सांख्यिकी भागात अ.क्र.१६ ते २० मधील माहिती सेरोगेट मदर अथवा प्रसृत होणाऱ्या मातेच्या बाबतीत लिहावी प्रसुतीचा प्रकार या ठिकाणी सरोगसी नमूद करुन प्रसुतीचा प्रकार नमूद करावा. उपरोक्त पध्दतीने हॉस्पिटलने नोंद निबंधक (जन्म-मृत्यु) यांचेकडे पाठवावी.

६) निबंधकाने नोंद करुन प्रमाणपत्र अदा करावे. ICMR यांच्या मसुदयातील कलम ३४ मधील उपकलम (१०) मधील सुचनानुसार जन्म प्रमाणपत्रामध्ये कायदेशिर पालकांचे नाव नमूद करण्याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे एकेरी पालकांच्या बाबतीत त्यांचे नाव आई अथवा वडिल जे लागू असेल ते आई अथवा वडिल यांच्या रकान्यात लिहून दुसरे नाव 'Not known' 'माहिती नाही' लिहून प्रमाणपत्र अदा करावे. केंद्र शासनाच्या जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या अधिनियमानुसार प्रत्येक घटनेची नोंद होणे बंधनकारक आहे व त्यानुसार प्रमाणपत्र वितरण होणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत सविनय सादर :- मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, मुंबई